RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-ल

वर्ष ९, अंक ४२(२)] गुरुवार, नोव्हेंबर ३०, २०२३/अग्रहायण ९, शके १९४५ [पृष्ठे ११, किंमत : रुपये १६.००

असाधारण क्रमांक ५९

### प्राधिकृत प्रकाशन

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.**

### उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२३.

### अधिसूचना

**इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवा शर्तींचे विनियमन) अधिनियम, १९९६.**

क्रमांक इबांका ०५२३/प्र.क्र. ७६/कामगार-७.—इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवा शर्तींचे विनियमन) अधिनियम,१९९६ (१९९६ चा २७) याची कलमे ६२ व ४० तसेच कलम २२ चे पोट-कलम (१) याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, उक्त अधिनियमाच्या कलम ५ अन्वये घटित केलेल्या तज्ञ समितीशी विचारविनिमय केल्यानंतर, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवा शर्तींचे विनियमन) नियम, २००७ यात सुधारणा करण्यासाठी, याद्वारे, पुढील नियम करीत आहेः—

**१.** या नियमांस, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवा शर्तींचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०२३ असे म्हणावे.

**२.** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवा शर्तींचे विनियमन) नियम, २००७ याच्या ४५ ऐवजी, पुढील नियम दाखल करण्यात येईलः—

"**४५. मंडळाची कार्ये.**—(१) मंडळास, निधीच्या उपलब्धतेस अधीन राहून, ठरावाद्वारे, लाभार्थ्यांना, पुढील प्रयोजनांसाठी वित्तीय सहाय्य पुरविता येईलः—

**(अ) घराचे बांधकाम करण्यासाठी लाभार्थ्यास वित्तीय सहाय्य:**—मंडळ, घराचे बांधकाम करण्यासाठी किंवा घर खरेदी करण्यासाठी लाभार्थ्यास, पुढील अटी व शर्तींस अधीन राहून, रुपये २,००,००० (दोन लाख रुपये फक्त) पेक्षा अधिक नसेल इतके कर्ज व अग्रिम किंवा वित्तीय सहाय्य मंजूर करू शकेल:—

(क) लाभार्थी, तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी राज्यामधील कोणत्याही इमारतीमध्ये किंवा अन्य बांधकाम कामामध्ये काम करीत असावा.

(ख) लाभार्थी, राज्यामध्ये घराचे बांधकाम करण्याकरिता किंवा घर खरेदी करण्यासाठी या योजनेखालील लाभ मिळण्यासाठी हक्कदार असेल.

(ग) घराचे बांधकाम करण्याकरिता या योजनेखालील लाभ मिळण्यासाठी लाभार्थी किंवा लाभार्थी, जमिनीच्या मालकीचा पुरावा आणि संबंधित स्थानिक प्राधिकरणाने दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र सादर करतील.

(घ) घर खरेदी करण्यासाठी या योजनेखालील लाभ मिळण्याकरिता, लाभार्थी किंवा लाभार्थी, विक्रीचा करारनामा सादर करतील.

(ङ) लाभार्थी, आयुष्यात केवळ एकदाच या योजनेखालील लाभ मिळण्यास हक्कदार असेल.

(च) असा लाभ, लाभार्थीचा पती, लाभार्थ्याची पत्नी व अठरा वर्षांखालील मुलांचा समावेश असलेल्या लाभार्थ्यांच्या कुटुंबासाठी एकदाच देण्यात येईल.

**(ब) लाभार्थ्यांच्या मुलांच्या शिक्षणाकरिता वित्तीय सहाय्य:—**

(क) लाभार्थ्यांच्या मुलांच्या शिक्षणाकरिता वित्तीय सहाय्य योजना पुढीलप्रमाणे आहेत:—

(एक) लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलांना वित्तीय सहाय्य (इयत्ता १ ली ते ७ वी).—मंडळ, इयत्ता १ ली ते ७ वी वर्गाकरिता प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी लाभार्थ्याच्या प्रत्येक विद्यार्थी मुलास रुपये २,५०० (रुपये दोन हजार पाचशे फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(दोन) माध्यमिक शिक्षणासाठी लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलांना वित्तीय सहाय्य (इयत्ता ८ वी ते १० वी).—मंडळ, इयत्ता ८ वी ते १० वी वर्गाकरिता प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी लाभार्थ्याच्या प्रत्येक विद्यार्थी मुलास रुपये ५,००० (रुपये पाच हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(तीन) उच्च माध्यमिक शिक्षणासाठी लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलांना वित्तीय सहाय्य (इयत्ता ११ वी ते १२ वी).—मंडळ, इयत्ता ११ ते १२ वर्गाकरिता प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी लाभार्थ्याच्या प्रत्येक विद्यार्थी मुलास रुपये १०,००० (रुपये दहा हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(चार) इयत्ता १० वी व १२ वी उत्तीर्ण झाल्यावर लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलास प्रोत्साहनपर रक्कम.—मंडळ, प्रत्येक इयत्तेमध्ये किमान पन्नास टक्के गुणांसह इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी (दोन्ही इयत्तांमध्ये) उत्तीर्ण झाल्यावर प्रोत्साहनपर रक्कम म्हणून लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलास रुपये १०,००० (रुपये दहा हजार फक्त) इतके अर्थसहाय देऊ शकेल.

(पाच) लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलास पदवीसाठी वित्तीय सहाय्य.—मंडळ, कोणत्याही पदवी पाठ्यक्रमासाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षाकरिता लाभार्थ्याच्या प्रत्येक विद्यार्थी मुलास, रुपये २०,००० (रुपये वीस हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल. ज्या पदवी पाठ्यक्रमांना संबंधित नियामक प्राधिकरणांनी मान्यता दिलेली आहे आणि केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे अशा पदवी पाठ्यक्रमांनाच केवळ वित्तीय सहाय्य देण्यात येईल.

(सहा) लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलास पदव्युतर पदवीसाठी वित्तीय सहाय्य.—मंडळ, कोणत्याही पदव्युतर पदवी अभ्यास पाठ्यक्रमासाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षाकरिता लाभार्थ्याच्या प्रत्येक विद्यार्थी मुलास, रुपये २५,००० (रुपये पंचवीस हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल. ज्या पदव्युतर पदवी पाठ्यक्रमांना संबंधित नियामक प्राधिकरणांनी मान्यता दिलेली आहे आणि केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे अशा पदव्युतर पदवी पाठ्यक्रमांनाच केवळ वित्तीय सहाय्य देण्यात येईल.

(सात) लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलास पदविकेसाठी वित्तीय सहाय्य.—मंडळ, कोणत्याही पदविका पाठ्यक्रमांसाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षाकरिता लाभार्थ्याच्या प्रत्येक विद्यार्थी मुलास, रुपये २०,००० (रुपये वीस हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल. ज्या पदविका पाठ्यक्रमांना संबंधित मंडळाने किंवा नियामक प्राधिकरणांनी मान्यता दिलेली आहे आणि केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे अशा पदविका पाठ्यक्रमांनाच केवळ वित्तीय सहाय्य देण्यात येईल.

(आठ) लाभार्थ्यांच्या विद्यार्थी मुलास वैद्यकीय पदवी पाठ्यक्रमांसाठी वित्तीय सहाय्य.—मंडळ, वैद्यकीय पदवी पाठ्यक्रमांसाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षाकरिता लाभार्थ्यांच्या प्रत्येक विद्यार्थी मुलास, रुपये १,००,००० (रुपये एक लाख फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल. ज्या वैद्यकीय पदवी पाठ्यक्रमांना संबंधित नियामक प्राधिकरणांनी मान्यता दिलेली आहे आणि केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे अशा वैद्यकीय पदवी पाठ्यक्रमांनाच केवळ वित्तीय सहाय्य देण्यात येईलः

परंतु, लाभार्थ्यांच्या ज्या मुलास, "लाभार्थ्यांच्या विद्यार्थी मुलास पदवीकरिता अर्थसहाय्य" या योजनेखाली लाभ मिळालेला आहे असे मूल, वैद्यकीय पदवी पाठ्यक्रमासाठी वित्तीय सहाय्याचा लाभ मिळण्यासाठी पात्र असणार नाही.

(नऊ) लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलास अभियांत्रिकी पदवी पाठ्यक्रमांसाठी वित्तीय सहाय्य.—मंडळ, अभियांत्रिकी पदवी पाठ्यक्रमांसाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षाकरिता लाभार्थ्यांच्या प्रत्येक विद्यार्थी मुलास, रुपये ६०,००० (रुपये साठ हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल. ज्या अभियांत्रिकी पदवी पाठ्यक्रमांना संबंधित नियामक प्राधिकरणांनी मान्यता दिलेली आहे आणि केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे अशा अभियांत्रिकी पदवी पाठ्यक्रमांनाच केवळ वित्तीय सहाय्य देण्यात येईलः

परंतु, लाभार्थ्यांच्या ज्या मुलास, "लाभार्थ्यांच्या विद्यार्थी मुलास पदवीकरिता अर्थसहाय्य" या योजनेखाली लाभ मिळालेला आहे असे मूल, अभियांत्रिकी पदवी पाठ्यक्रमासाठी वित्तीय सहाय्याचा लाभ मिळण्यासाठी पात्र असणार नाही.

(दहा) लाभार्थ्याचा विद्यार्थी मुलास संगणक शिक्षणाकरिता (एमएस- सीआयटी) वित्तीय सहाय्य.—मंडळ, लाभार्थ्याचे जे मूल, एमएस-सीआयटी पाठ्यक्रम उत्तीर्ण झालेले आहे अशा प्रत्येक मुलास, एमएस-सीआयटी पाठ्यक्रम शुल्काची प्रतिपूर्ती म्हणून, रुपये ५,००० (रुपये पाच हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल. लाभार्थ्यांचे मूल, त्याने ज्या संस्थेमधून असा पाठ्यक्रम पूर्ण केला आहे त्या संबंधित संस्थेचे एमएस-सीआयटी प्रमाणपत्र सादर करील.

(ख) या पोट-नियमांमध्ये नमूद केलेल्या वर निर्दिष्ट केलेल्या वित्तीय सहाय्याच्या योजना, पुढील सर्वसाधारण अटी व शर्तींना अधीन राहून, लाभार्थ्यांच्या मुलास लागू करण्यात येतील:—

(एक) लाभार्थीची पहिली दोन मुलेच केवळ वित्तीय सहाय्य योजनांचा लाभ मिळण्यास पात्र आहेत.

(दोन) जर वडील व आई दोघेही लाभार्थी असतील तर, त्यांची मुले, एकतर वडिलांच्या किंवा आईच्या वतीने या योजनांखालील लाभ मिळण्यास पात्र असतील.

(तीन) पुढील इयत्तेसाठी किंवा संबंधित शैक्षणिक पाठ्यक्रमांसाठी वित्तीय सहाय्य मिळविण्याकरिता लाभार्थीच्या मुलाने मागील इयत्ता उत्तीर्ण केलेली असावी.

(चार) लाभार्थी, त्याचे मूल ज्या शाळेमधून किंवा संस्थेमधून मागील इयत्ता किंवा संबंधित शैक्षणिक पाठ्यक्रम उत्तीर्ण झाले आहे त्या संबंधित शाळेची किंवा संस्थेची गुणपत्रिका सादर करील.

(पाच) लाभार्थी, त्याचे मूल ज्या शाळेमधून किंवा संस्थेमधून मागील इयत्ता किंवा संबंधित शैक्षणिक पाठ्यक्रम उत्तीर्ण झाले आहे त्या संबंधित शाळेचे किंवा संस्थेचे बोनाफाईड प्रमाणपत्र सादर करील.

(सहा) लाभार्थी, त्याच्या मुलाने ज्या शाळेमधून किंवा संस्थेमधून मागील इयत्ता किंवा संबंधित शैक्षणिक पाठ्यक्रम पूर्ण केलेला आहे त्या संबंधित शाळेचा किंवा संस्थेचा उपस्थितीचा पुरावा (किमान पंचाहत्तर टक्के उपस्थिती) सादर करील.

(सात) लाभार्थी, फक्त निकट मागील शैक्षणिक वर्षासाठी अर्ज करू शकतो आणि निकाल जाहीर झाल्यानंतर एक वर्षाच्या आत अर्ज सादर करावा लागेल.

**(क) लाभार्थ्याच्या विवाहासाठी वित्तीय सहाय्य:—** मंडळ, लाभार्थ्याच्या विवाहासाठी, पुढील अटी व शर्तीस अधीन राहून, रुपये ३०,००० (रुपये तीस हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल:—

(एक) हे वित्तीय सहाय्य, केवळ लाभार्थ्याच्या पहिल्या विवाहासाठीच असेल.

(दोन) जर पती व पत्नी दोघेही लाभार्थी असतील तर, ते केवळ एकाच लाभासाठी पात्र आहेत.

(तीन) लाभार्थी, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले विवाह प्रमाणपत्र सादर करील.

(चार) लाभार्थी, पती व पत्नी या दोघांच्या जन्माचा पुरावा सादर करील. पतीचे वय एकवीस वर्षे किंवा त्याहून अधिक असावे आणि पत्नीचे वय अठरा वर्षे किंवा त्याहून अधिक असावे.

**(ड) लाभार्थ्याच्या मुलीच्या विवाहासाठी वित्तीय सहाय्य:—** मंडळ, लाभार्थ्याच्या मुलीच्या विवाहासाठी, पुढील अटी व शर्तीस अधीन राहून, रुपये ५१,००० (रुपये एकावन्न हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल:—

(एक) हे वित्तीय सहाय्य, केवळ लाभार्थ्याच्या एका मुलीच्या विवाहासाठीच असेल.

(दोन) जर पती व पत्नी दोघेही लाभार्थी असतील तर, ते केवळ एकाच लाभासाठी पात्र आहेत.

(तीन) लाभार्थी, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले विवाह प्रमाणपत्र सादर करील.

(चार) लाभार्थी, पती व पत्नी या दोघांच्या जन्माचा पुरावा सादर करील. पतीचे वय एकवीस वर्षे किंवा त्याहून अधिक असावे आणि पत्नीचे वय अठरा वर्षे किंवा त्याहून अधिक असावे.

**(इ) एका मुलीच्या जन्मानंतर कुटुंब नियोजनासाठी लाभार्थ्यास वित्तीय सहाय्य:—** मंडळ, जी लाभार्थ्याची एकुलती एक मुलगी आहे अशा मुलीच्या नावे, ती अठरा वर्षांची होईपर्यंत, कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेमधील लाभार्थ्याच्या खात्यामध्ये, पुढील अटी व शर्तीस अधीन राहून, रुपये १,००,००० (रुपये एक लाख फक्त) इतकी नियत ठेव जमा करू शकेल:—

(एक) जर पती व पत्नी दोघेही लाभार्थी असतील तर, ते केवळ एकाच लाभासाठी पात्र आहेत.

(दोन) लाभार्थी, केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेले कुटुंब नियोजन प्रमाणपत्र सादर करील.

(तीन) लाभार्थी, त्याला एकुलती एक मुलगी असल्याचा पुरावा सादर करील.

**(फ) लाभार्थ्यास भांड्यांचा पुरवठा करणे:—** मंडळ, राज्य शासनाकडून मान्य करण्यात येतील अशा प्रकारच्या भांड्यांचा, पुढील अटी व शर्तीस अधीन राहून, लाभार्थ्यांना पुरवठा करू शकेल:—

(एक) लाभार्थ्यांना, आयुष्यात केवळ एकदाच भांडी पुरवण्यात येतील.

(दोन) पती, पत्नी व अठरा वर्षांखालील मुलांचा समावेश असलेल्या कुटुंबाला केवळ एकदाच हा लाभ देण्यात येईल.

**(ग) लाभार्थ्यास सुरक्षा संचाचा (किटचा) पुरवठा करणे:—** मंडळ,राज्य शासनाकडून मान्य करण्यात येईल अशा प्रकारच्या सुरक्षा संचाचा (किटचा) लाभार्थ्यांना,आयुष्यात एकदाच पुरवठा करू शकेल.

**(ह) लाभार्थ्यास अत्यावश्यक संचाचा (किटचा) पुरवठा करणे:—** मंडळ,राज्य शासनाकडून मान्य करण्यात येईल अशा प्रकारच्या अत्यावश्यक संचाचा (किटचा) लाभार्थ्यांना,आयुष्यात एकदाच पुरवठा करू शकेल.

**(आय) लाभार्थ्यास आरोग्य संचाचा (किटचा) पुरवठा करणे:—** मंडळ,राज्य शासनाकडून मान्य करण्यात येईल अशा घटकांचा अंतर्भाव असणाऱ्या आरोग्य संचाचा (किटचा) लाभार्थ्यांना पुरवठा करू शकेल.

**(जे) मृत्यू झाल्यास, लाभार्थ्यास वित्तीय सहाय्य करणे:—**

(एक) मंडळ, ५१ ते ६० वर्षांच्या दरम्यान लाभार्थ्यांचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास, लाभार्थ्यांच्या कायदेशीर वारसांना रुपये २,००,००० (रुपये दोन लाख फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(दोन) मंडळ, कोणत्याही वयातील लाभार्थ्यांचा बांधकाम स्थळावर (साइटवर) अपघाती मृत्यू झाल्यास, लाभार्थ्यांच्या कायदेशीर वारसांना रुपये ५,००,००० (रुपये पाच लाख फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(तीन) मंडळ, ५१ ते ६० वर्षांच्या दरम्यान लाभार्थ्यांचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास किंवा अपघाती मृत्यू झाल्यास, त्याच्या अंत्यसंस्कारासाठी तात्काळ मदत म्हणून लाभार्थ्यांच्या कायदेशीर वारसांना, रुपये १०,००० (रुपये दहा हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(चार) मंडळ, ५१ ते ६० वर्षांच्या दरम्यान लाभार्थ्यांचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास किंवा अपघाती मृत्यू झाल्यास, पाच वर्षांसाठी नुकसानभरपाई म्हणून लाभार्थ्यांच्या कायदेशीर वारसांना, दरवर्षी रुपये २४,००० (रुपये चोवीस हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(पाच) मंडळ, ५१ ते ६० वर्षांच्या दरम्यान लाभार्थ्यांचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास किंवा अपघाती मृत्यू झाल्यास, शववाहतूक खर्चासाठी लाभार्थ्यांच्या कायदेशीर वारसांना, प्रति किलोमीटर रुपये २० (रुपये वीस फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(सहा) मंडळ, नैसर्गिक बाळंतपणासाठी लाभार्थीस, रुपये १५,००० (रुपये पंधरा हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल. लाभार्थीची पहिली दोन मुले या योजनेखालील लाभ मिळण्यास पात्र आहेत.

(सात) मंडळ, सिझेरियन प्रसूतीसाठी लाभार्थीस, रुपये २०,००० (रुपये वीस हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल. लाभार्थीची पहिली दोन मुले या योजनेखालील लाभ घेण्यास पात्र आहेत.

(आठ) जर पती-पत्नी दोघेही लाभार्थी असतील तर, ते उपखंड (सहा) व (सात) मध्ये नमूद केलेल्या योजनांसाठी केवळ एकाच लाभाकरिता पात्र आहेत.

(नऊ) मंडळ, पंचाहत्तर टक्के किंवा त्यापेक्षा अधिक अपंगत्व असल्यास, लाभार्थ्यास रुपये २,००,००० (रुपये दोन लाख फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(दहा) मंडळ, राज्य शासनाने, सरकारी कर्मचाऱ्यांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये, जे गंभीर असल्याचे विनिर्दिष्ट केलेले आहेत अशा आजारांच्या उपचारांसाठी लाभार्थ्यास रुपये १,००,००० (रुपये एक लाख फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(अकरा) मंडळ, लाभार्थ्यास कृत्रिम अवयव बसवण्याच्या खर्चाची, भारतीय कृत्रिम अवयव निर्मिती महामंडळास संपूर्ण प्रतिपूर्ती करू शकेल.

(बारा) मंडळ, केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या योजनांनुसार आरोग्य तपासणी करू शकेल.

(तेरा) या खंडात नमूद केलेल्या योजनांचा लाभ मिळण्यासाठी, लाभार्थी, केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या संबंधित वैद्यकीय व्यवसायीने किंवा वैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करील.

(चौदा) मंडळ, या खंडात नमूद केलेल्या एक किंवा अधिक योजनांसाठी राज्य शासनाच्या मान्यतेने, सर्वसमावेशक विमा योजना तयार करू शकेल.

**(के) लाभार्थ्यांना जेवण किंवा पोषक आहार यांचा पुरवठा करणे:-** मंडळ, राज्य शासनाच्या मान्यतेने, लाभार्थ्यांना जेवण किंवा पोषक आहार पुरविण्याचा निर्णय घेऊ शकेल. अशा जेवणाचा किंवा पोषक आहाराचा मेनू, प्रमाण व वेळ राज्य शासनाच्या मान्यतेने, मंडळाकडून ठरवण्यात येईल.

**(२) जर लाभार्थ्यास, केंद्र सरकारकडून किंवा राज्य शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या योजनेचा लाभ मिळत असेल तर, लाभाची द्विरुक्ती टाळण्यासाठी, मंडळाकडून राबविण्यात येत असलेल्या योजनेचा लाभ मिळण्यासाठी उक्त लाभार्थी पात्र असणार नाही.**

(३) मंडळ, निधीच्या उपलब्धतेच्या अधीन राहून, अधिनियमाच्या कलम २२ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ह) खालील इतर उपाययोजनांसाठी व सुविधांसाठी देखील तरतूद करू शकेल, जसे कीः-

**(अ) जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्र (DBWFC) स्थापन करणे:—**

(एक) मंडळ, लाभार्थ्यांना सहाय्य करण्यासाठी राज्य शासनाच्या मान्यतेने, आवश्यकतेनुसार प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक किंवा अधिक जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्रे स्थापन करू शकेल.

(दोन) अधिनियमाखालील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना लाभ मिळण्यासाठी जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्र, प्रत्येक बांधकाम कामगारास, नोंदणी करण्याची व सर्व प्रकारच्या नमुन्यांची प्रक्रिया करण्याची सुविधा देऊ शकेल.

(तीन) राज्य शासनाद्वारे प्राधिकृत करण्यात येईल असा अधिकारी, जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्राच्या प्रमुख पदी असेल.

(चार) सुलभपणे काम करण्याकरिता प्रत्येक जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्राला, आवश्यक मनुष्यबळ व पायाभूत सुविधा पुरविता येतील.

**(ब) तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र (TBWFC) स्थापन करणे:—**

(एक) मंडळ, राज्य शासनाच्या मान्यतेने, आवश्यकतेनुसार प्रत्येक तालुक्यामध्ये एक किंवा अधिक तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रे अथवा एकापेक्षा अधिक तालुक्यांसाठी असे एक केंद्र स्थापन करू शकेल.

(दोन) अधिनियमाखालील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना लाभ मिळण्यासाठी तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र, बांधकाम कामगारास, नोंदणी करण्याची व सर्व प्रकारच्या नमुन्यांची प्रक्रिया करण्याची सुविधा देऊ शकेल.

(तीन) तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र, जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्राच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली काम करू शकेल.

(चार) सुलभपणे काम करण्याकरिता प्रत्येक तालुका इमारत कामगार सुविधा केंद्राला, आवश्यक मनुष्यबळ व पायाभूत सुविधा पुरविता येतील.

**(क) इमारत कामगारांसाठी शेड (कामगार नाका) बांधणे:—**

(एक) मंडळ, बांधकाम कामगारांना काम मिळवण्यासाठी एकत्र जमण्याकरिता स्थानिक प्राधिकरणाच्या मान्यतेने, स्थानिक प्राधिकरणाच्या हद्दीतील अशा ठिकाणी छपऱ्या (शेड) (कामगार नाका) बांधू शकेल.

(दोन) राज्य शासनाच्या मान्यतेने, मंडळाने ठरवल्यानुसार या छपऱ्यांमध्ये (शेडमध्ये) पाणी व इतर कोणत्याही अत्यावश्यक सेवांची सोय केली जाऊ शकेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विनीता वेद सिंगल,**
शासनाचे प्रधान सचिव.

## INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated 30th November, 2023.

*NOTIFICATION*

BUILDING AND OTHER CONSTRUCTION WORKERS (REGULATION OF EMPLOYMENT AND CONDITION OF SERVICE) ACT, 1996.

No.EBAKA0523/CR 76/Lab-7.—In exercise of the powers conferred by sections 62 and 40 read with sub-section (*1*) of section 22 of the Building and other Construction Workers (Regulation of Employment and Condition of Service) Act, 1996 (27 of 1996), the Government of Maharashtra, after consultation with the Expert Committee constituted under section 5 of the said Act, hereby makes the following rules to amend the Maharashtra Building and other Construction Workers (Regulation of Employment and Condition of Service) Rules, 2007, namely:—

1. These rules may be called the Maharashtra Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Condition of Service) (Amendment) Rules, 2023.

2. For rule 45 of the Maharashtra Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Condition of Service) Rules, 2007, the following rule shall be substituted, namely :—

"**45.** *Functions of the Board.*—(*1*) The Board may, by resolution, subject to the availability of funds, provide the financial assistance to the beneficiary for the following purposes, namely:—

(*A*) *Financial assistance for construction of house to beneficiary.*—The Board may sanction loans and advances or financial assistance to a beneficiary for construction or purchase of a house not exceeding Rs. 2,00,000 (rupees two lakhs only), subject to the following terms and conditions, namely:—

(*a*) The beneficiary has been engaged in any building or other construction work in the State for not less than three years.

(*b*) The beneficiary shall be entitled to avail benefit under this scheme for construction or purchase of house in the State.

(*c*) For availing benefit under this scheme for construction of house, the beneficiary or beneficiaries shall submit proof of ownership of land and No Objection Certificate from the concerned local authority.

(*d*) For availing benefit under this scheme for purchase of house the beneficiary or beneficiaries shall submit Agreement of Sale.

(*e*) The beneficiary shall be entitled to avail benefit under this scheme once in a lifetime.

(*f*) Such benefit shall be given once for a family of beneficiary which includes husband, wife and children below age of eighteen years.

(*B*) *Financial assistance for education of children of the beneficiaries.*—(*a*) The financial assistance schemes for education of children of the beneficiaries are as follows:-

(*i*) *Financial assistance to student children of beneficiary (1st to 7th Standard).*—The Board may give financial assistance of Rs. 2,500 (rupees two thousand five hundred only) per student child of a beneficiary per academic year for 1st to 7th standard.

(*ii*) *Financial assistance to student child of beneficiary for secondary education (8th to 10th Standard).*— The Board may give financial assistance of Rs. 5,000 (rupees five thousand only) per student child of beneficiary per academic year for 8th to 10th standard.

(*iii*) *Financial assistance to student child of beneficiary for higher secondary education (11th to 12th Standard).*—The Board may give financial assistance of Rs. 10,000 (rupees ten thousand only) per student child of beneficiary per academic year for 11th and 12th standard.

(*iv*) *Incentive to student child of beneficiary on passing 10th and 12th Standard.*—The Board may give financial assistance of Rs. 10,000 (rupees ten thousand only) to a student child of beneficiary as an incentive on passing 10th standard and 12th standard (in both standards) with minimum fifty per cent. marks in each standard.

(*v*) *Financial assistance to student child of beneficiary for graduation.*—The Board may give financial assistance of Rs. 20,000 (rupees twenty thousand only) per student child of beneficiary per academic year for any graduate courses. The financial assistance shall be given only to such graduate courses which are recognized by concerned regulatory authorities and approved by the Central Government or the State Government.

(*vi*) *Financial assistance student child of beneficiary for post graduation.*—The Board may give financial assistance of Rs. 25,000 (rupees twenty five thousand only) per student child of beneficiary per academic year for any post graduate courses. The financial assistance shall be given only to such post graduate courses which are recognized by concerned regulatory authorities and approved by the Central Government or the State Government.

(*vii*) *Financial assistance student child of beneficiary for diploma.*—The Board may give financial assistance of Rs. 20,000 (rupees twenty thousand only) per student child of beneficiary per academic year for any diploma courses. The financial assistance shall be given only to such diploma courses which are recognized by concerned Board or regulatory authorities and approved by the Central Government or the State Government.

(*viii*) *Financial assistance to student child of beneficiary for graduate courses in medical.*— The Board may give financial assistance of Rs. 1,00,000 (rupees one lakhs only) per student per academic year for graduate courses in medical. The financial assistance shall be given only to such graduate courses in medical which are recognized by concerned regulatory authorities and approved by the Central Government or the State Government:

Provided that, child of a beneficiary who has availed benefit under "Financial assistance to student child of beneficiary for graduation" shall not be eligible to avail benefit of financial assistance for graduate courses in medical.

(*ix*) *Financial assistance to student child of beneficiary for graduate courses in engineering.*—The Board may give financial assistance of Rs. 60,000 (rupees sixty thousand only) per student child of beneficiary per academic year for graduate courses in engineering. The financial assistance shall be given only to such graduate courses in engineering which are recognized by concerned regulatory authorities and approved by the Central Government or the State Government:

Provided that, child of a beneficiary who has availed benefit under "Financial assistance to student child of beneficiary for graduation" shall not be eligible to avail benefit of financial assistance for graduate courses in engineering.

(*x*) *Financial assistance to child of beneficiary for Computer Education* (*MS-CIT*).—The Board may give financial assistance of Rs. 5,000 (rupees five thousand only) per child of a beneficiary who has passed the MS-CIT course as reimbursement of MS-CIT course fee. A child of a beneficiary shall submit MS-CIT certificate of concerned institute from where child has completed such course.

(*B*) The above referred Financial Assistance Schemes mentioned in this sub-rule shall be applicable to the child of a beneficiary subject to the following general terms and conditions, namely:—

(*i*) First two children of beneficiary are eligible to avail the benefit of the financial assistance schemes.

(*ii*) In case where father and mother both are beneficiaries, then their children shall be eligible to avail benefit under the schemes on behalf of either father or mother.

(*iii*) The beneficiary's child should have passed the previous standard to avail the financial assistance for next standard or concerned educational courses.

(*iv*) The beneficiary shall submit mark sheet of concerned school or institute from where child has passed previous standard or concerned educational courses.

(*v*) The beneficiary shall submit bonafide certificate of concerned school or institute from where child has passed the previous standard or concerned educational courses.

(*vi*) The beneficiary shall submit attendance proof (at least seventy five per cent. attendance) of concerned school or institute from where child has completed previous standard or concerned educational courses.

(*vii*) The beneficiary can only apply for immediate previous academic year and have to submit application within one year after declaration of result.

(*C*) *Financial assistance for marriage of beneficiary.*—The Board may give financial assistance of Rs. 30,000 (rupees thirty thousand only) for marriage of beneficiary, subject to the following terms and conditions, namely:—

(*i*) This financial assistance shall be for first marriage of beneficiary only.

(*ii*) If husband and wife both are beneficiaries, then they are eligible for one benefit only.

(*iii*) The beneficiary shall submit marriage certificate of Competent Authority.

(*iv*) The beneficiary shall submit birth proof of both husband and wife. The husband should be twenty one years old or more and wife should be eighteen years old or more.

(*D*) *Financial assistance for marriage of daughter of beneficiary.*—The Board may give financial assistance of Rs. 51,000 (rupees fifty one thousand only) for marriage of daughter of beneficiary, subject to the following terms and conditions, namely:-

(*i*) This financial assistance shall be for marriage of one daughter of beneficiary only.

(*ii*) If husband and wife both are beneficiaries, then they are eligible for one benefit only.

(*iii*) The beneficiary shall submit marriage certificate of Competent Authority.

(*iv*) The beneficiary shall submit birth proof of both husband and wife. The husband should be twenty one years old or more and wife should be eighteen years old or more.

(*E*) *Financial assistance to beneficiary for family planning after one daughter.*—The Board may keep Fixed Deposit of Rs. 1,00,000 (rupees one lakh only) in the name of a daughter who is the only child of beneficiary upto her age of eighteen years in account of beneficiary in any Nationalized Bank, subject to the following terms and conditions, namely:-

(*i*) If husband and wife both are beneficiaries, then they are eligible for one benefit only.

(*ii*) The beneficiary shall submit family planning certificate from concerned Medical Officer authorized by the Central Government or the State Government.

(*iii*) The beneficiary shall submit proof of having only one daughter.

(*F*) *Supply of utensils to beneficiary.*—The Board may supply such types of utensils which are approved by the State Government, to the beneficiaries, subject to the following terms and conditions, namely:—

(*i*) The beneficiaries shall be supplied with utensils once in lifetime.

(*ii*) The benefit shall be given only once to family, which includes husband, wife and children below the age of eighteen years.

(*G*) *Supply of safety kit to beneficiary.*—The Board may supply such types of safety kit which is approved by the State Government to the beneficiaries once in lifetime.

(*H*) *Supply of essential kit to beneficiary.*— The Board may supply such types of essential kit which is approved by the State Government to the beneficiaries once in lifetime.

(*I*) *Supply of health kit to beneficiary.*—The Board may supply such health kit containing such ingredients which are approved by the State Government to the beneficiaries.

(*J*) *Financial assistance to beneficiary in case of death.*—

(*i*) The Board may give financial assistance of Rs. 2,00,000 (rupees two lakhs only) to legal heirs of beneficiary in case of natural death of beneficiary between 51 to 60 years.

(*ii*) The Board may give financial assistance of Rs. 5,00,000 (rupees five lakhs only) to legal heirs of beneficiary in case of accidental death of beneficiary on construction site at any age.

(*iii*) The Board may give financial assistance of Rs. 10,000 (rupees ten thousand only) to legal heirs of beneficiary as immediate assistance for funeral in case of natural death of beneficiary between 51 to 60 years or accidental death of beneficiary.

(*iv*) The Board may give financial assistance of Rs. 24,000 per year (rupees twenty four thousand only) to legal heirs of beneficiary as compensation for five years in case of natural death of beneficiary between 51 to 60 years or accidental death of beneficiary.

(*v*) The Board may give financial assistance of Rs. 20 per kilometer (rupees twenty only) to legal heirs of beneficiary for cadaver transportation cost in case of natural death of beneficiary between 51 to 60 years or accidental death of beneficiary.

(*vi*) The Board may give financial assistance of Rs. 15,000 (rupees fifteen thousand only) to beneficiary for natural child birth. First two children of beneficiary are eligible to avail the benefit under this scheme.

(*vii*) The Board may give financial assistance of Rs. 20,000 (rupees fifteen thousand only) to beneficiary for cesarean child birth. First two children are eligible to avail the benefit under this scheme.

(*viii*) If husband and wife both are beneficiaries, then they are eligible for only one benefit for schemes mentioned in sub- clauses (*vi*) and (*vii*).

(*ix*) The Board may give financial assistance of Rs. 2,00,000 (rupees two lakhs only) to beneficiary in case of seventy five per cent. or more disability.

(*x*) The Board may give financial assistance of Rs. 1,00,000 (rupees one lakh only) to beneficiary for treatment of such critical illnesses which are specified by the State Government in the Public Health Department for Government servants.

(*xi*) The Board may fully reimburse to Artificial Limb Manufacturing Corporation of India for fitting artificial organ to beneficiary.

(*xii*) The Board may conduct health checkup as per Central Government or State Government Schemes.

(*xiii*) The beneficiary shall submit medical certificate from concerned Medical Practitioner or Medical Officer authorized by the Central Government or the State Government to avail benefit of schemes mentioned in this clause.

(*xiv*) The Board may, with approval of the State Government, formulate comprehensive insurance schemes for one or more schemes mentioned in this clause.

(*K*) *Supply of meal or nutritious food to beneficiaries.*—The Board may, with approval of the State Government, decide to supply meal or nutritious food to beneficiaries. Menu, quantity and time of such meal or nutritious food may be decided by the Board with approval of the State Government.

**(2) If the beneficiary has availed the benefit of any scheme implemented by the Central Government or the State Government, the said beneficiary shall not be eligible to avail the benefit of the scheme implemented by the Board to avoid duplication of benefits.**

(*3*) The Board may, subject to the availability of funds, also make the provisions for the following other measures and facilities under clause (*h*) of sub-section (*1*) of section 22 of the Act, namely:—

(*A*) *To establish District Building Workers Facilitation Centre (DBWFC).*—

(*i*) The Board may, with approval of State Government, establish one or more District Building Workers Facilitation Centers for assisting beneficiaries in every district as per requirement.

(*ii*) The District Building Workers Facilitation Center may facilitate every building worker for registration and processing of all types of forms to avail benefits to registered building workers under the Act.

(*iii*) The District Building Workers Facilitation Center may be headed by such officer as may be authorized by the Government.

(*iv*) Every District Building Workers Facilitation Center may be supplied with required manpower and infrastructure to facilitate the work.

(*B*) *To establish Taluka Building Workers Facilitation Centre (TBWFC).*—

(*i*) The Board may, with approval of the State Government, establish one or more Taluka Building Workers Facilitation Centre (TBWFC) in every Taluka or one such Centre for more than one Taluka as per requirement.

(*ii*) The TBWFC may facilitate building worker for registration and processing of all types of forms to avail benefits to registered building workers under the Act.

(*iii*) The TBWFC may work under the administrative control of the District Building Workers Facilitation Centre (DBWFC).

(*iv*) Every TBWFC may be supplied with required manpower and infrastructure to facilitate the work.

(*C*) *Construction of shed for Building Workers (Kamgar Naka).*—

(*i*) The Board may construct sheds at such places within the limits of local authority with the approval of local authority to facilitate building workers to assemble for obtaining work (Kamgar Naka).

(*ii*) These sheds may be facilitated with water and any other essential services as decided by the Board with the approval of the State Government."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VINITA VAID SINGAL,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.